संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
रोखठोक बेधडक
संपादकीय.....
॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# ज्यांच्यावर भिस्त ते राहुल गांधी सुस्त

आम्ही यापूर्वीच काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा गंभीर प्रश्न आहे असा मथळा देऊन आमची मते मांडली होती. आज नव्या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राहुल गांधींनी दांडी मारून स्वत:च्याच नेतृत्वाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सव्वाशे वर्ष जुना असलेला काँग्रेस पक्ष पंडित नेहरुंपासून एकाच घराण्याशी घुटमळत राहिला. इंदिरा गांधींपासून तर ती परंपराच पडली. जणूकाही हा पक्ष गांधी घराण्याने दत्तक घेतल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्याचाच दुष्परिणाम म्हणजे आज एवढ्या मोठ्या पक्षाला भक्कम नेतृत्व कोणी द्यावे, असा मुलभूत प्रश्न निर्माण झाला आहे. पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांनी राहुल गांधी यांना अधिवेशनापासून काही काळासाठी सुट्टी दिली. या सुट्टीमागचे नेमके कारण काय हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण लोकसभा निवडणुकीतल्या पराभवापाठोपाठ अन्य राज्यांमध्ये काँग्रेसने सपाटून मार खाल्ला. आणि तेव्हापासून राहुल गांधी यांच्यातला उत्साह ओसरलेला होता. कुठेच त्यांच्या नेतृत्वाला दाद मिळाली नाही. ते प्रभाव पाडू शकले नाहीत. सामान्य मतदारांचे तर सोडाच, परंतु त्यांच्याच पक्षातल्या अनेकांनी राहुल गांधी यांचे नेतृत्व मनापासून स्वीकारलेले दिसत नाही. लोकसभा निवडणुकीनंतर अनेकांना बोल फुटला. आणि राहुल गांधी हे काँग्रेसला नेतृत्व देऊ शकत नाहीत अशा प्रकारचा साक्षात्कारही झाला. गेल्याच महिन्यात काँग्रेसला राम राम ठोकून बाहेर पडणाऱ्या माजी केंद्रीय मंत्री जयंती नटराजन यांनी तर राहुल गांधी हे आपल्या खात्यामध्ये ढवळाढवळ करीत असल्याचा आरोप केला होता. म्हणजे जवळपास सगळ्याच निवडणुकांमधल्या पराभवाचा दणका त्यानंतर काँग्रेस पक्षात सुरू झालेली बंडाळीची परिस्थिती यातून निर्माण झालेले नैराश्य स्वत: राहुल गांधीदेखील लपवू शकलेले नाहीत असे म्हणावे लागते. परंतु एक प्रमुख राजकीय पक्ष म्हणून जर काँग्रेसला आपली भूमिका वठवायची असेल तर, काही गोष्टींचे भान ठेवावे लागेल. प्रामुख्याने संसदीय अधिवेशने आणि प्रमुख राष्ट्रीय प्रसंग यांचे औचित्य सांभाळावे लागेल. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीदेखील राहुल गांधी फारसे कुठे ठळकपणे उपस्थित नव्हते. तेव्हादेखील त्यांनी राष्ट्रीयदृष्ट्या या महत्त्वाच्या प्रसंगाचे योग्य ते भान ठेवले नव्हते. यावरून राहुल गांधींमधील नेतृत्वाच्या परिपक्वतेविषयीच काही प्रश्नचिन्ह उभे राहतात. आज तर अर्थसंकल्पीय अधिवेशनाकडे पाठ फिरवून त्यांनी विक्रमच केला असे म्हणावे लागते. हीच गोष्ट भाजपा किंवा अन्य पक्षांबाबत घडली असती तर, त्याविरोधात बराच मोठा गवगवा झाला असता, परंतु त्याहीपेक्षा आज जो काँग्रेस पक्ष अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे. त्याला नेटाने पुढे नेण्याची गरज असताना आणि जवळपास सगळ्याच प्रमुख काँग्रेस नेत्यांची गांधी घराण्यावर भिस्त असताना राहुल गांधी जर असे सुस्त राहत असतील, तर ही गोष्ट काँग्रेसच्यादृष्टीने निश्चितच विचार करण्यासारखी ठरते.

## राहुल गांधींच्या नेतृत्वाविषयी संभ्रम

असा प्रकार का घडावा तर त्याचे एकमेव उत्तर म्हणजे काँग्रेसच्या नेतृत्वाला कोणीही खुलेपणाने आव्हान देऊ शकत नाही. आणि या पक्षाच्या भवितव्याचा विचार करून कोणीही मोकळेपणाने विचारमंथन करायलाही तयार नाही. गांधी घराण्याविरुध्द बोलणे म्हणजे ती व्यक्ती काँग्रेसविरुध्द बोलत आहे असे चित्र आपोआप निर्माण होते. याचा अर्थ काँग्रेस म्हणजे गांधी घराणे आणि गांधी घराण्याविषयी निष्ठा म्हणजे ती काँग्रेस असे समीकरणच तयार झाले आहे. आता काळ बदललेला आहे. भारतातल्या एकूणच राजकारणाचा प्रवास पक्षीय ध्रुवीकरणाऐवजी वैचारिक ध्रुवीकरणाकडे होत आहे. भारतातल्या लोकशाहीचा प्रवास सत्तर वर्षाच्या दिशेने सुरू आहे. आपल्या बरोबरीचे जगातील देश किंवा शेजारचा चीन वेगाने प्रगती करतो आहे.

विज्ञान तंत्रज्ञानाने देशोदेशी विकासाचे नवे आयाम निर्माण केले आहेत. या विकासाचे जो पक्ष किंवा व्यक्ती मनापासून नेतृत्व करील त्याच्यामागे लोक उभे राहत आहेत. भारतासारख्या विकसनशील देशाला जर वेगाने पुढे जायचे असेल तर, तितक्याच धडाडीच्या नेतृत्वाची आवश्यकता आहे. ही पोकळी काही प्रमाणात भरून काढण्याचे काम सध्या नरेंद्र मोदी करताना दिसतात. गेल्या नऊ महिन्यांत त्यांच्या सरकारने केलेली कामे ही आर्थिक पातळीवर आशादायक चित्र निर्माण करणारी ठरली तर, एकूण विकासाच्या अजेंड्यावर येत्या वर्ष दोन वर्षात निश्चितपणाने काहीतरी घडेल, असा विश्वासही लोकांमध्ये निर्माण झाला आहे. ज्या भाजपाला पूर्ण बहुमत देऊन लोकांनी निवडून दिले. तिथेदेखील आज अनेक त्रुटी दिसून येतात. अहंमपणाचा भाव आणि दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात होत असलेली दिरंगाई या गोष्टी काँग्रेससारख्या पक्षाने लक्षात घेण्यासारखे आहे. आणि या मुद्यांवर सत्ताधारी पक्षाची कोंडी करता येण्यासारखी परिस्थिती आहे.

## अटळ नेतृत्वाने अधिवेशन टाळले

अगदी पूर्ण अनुकूल परिस्थिती जरी नसली तरी सत्ताधारी पक्षाच्या बऱ्याच उणिवा शोधून काँग्रेसला आपला प्रभाव निर्माण करता येऊ शकतो. यासाठी सातत्याने अभ्यासपूर्वक तयारी आणि नियोजन करावे लागेल. त्या गोष्टी नेतृत्वाकडून अपेक्षित असतात. काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्याच नेतृत्वाखाली पक्षाला पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र यासाठी राहुल गांधी किती तयार आहेत. याचीच त्यांना पूर्ण कल्पना आलेली दिसत नाही. दिग्विजय सिंह यांच्यासारख्या नेत्याने पक्षाचे अध्यक्षपद राहुल गांधींकडे सोपवण्याची मागणी केली होती. सोनिया गांधींनी मात्र तो निर्णय अद्याप घेतलेला नाही. त्यांना अजून थोडावेळ हवा आहे, असा खुलासा सोनिया गांधींनी केला. परंतु त्यांच्या या वेळ घेण्यामागे पक्षाला जे नुकसान सोसावे लागते त्याचे काय. ही जाणीव राहुल गांधींनाही झालेली दिसत नाही. अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या अधिवेशनाला गैरहजर राहण्यात त्यांनी एका अर्थी राजकीय औचित्याचाच भंग केल्यासारखा दिसून येतो. त्यांच्या उपस्थितीमागे न टाळता येण्यासारखे कारण असते तर गोष्ट वेगळी होती. परंतु काँग्रेसच्या या अटळ नेतृत्वाने अधिवेशन टाळणे संयुक्तिक ठरलेले नाही एवढे मात्र खरे.